# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** सहकार नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0111 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**30/03/2026 03:35

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिंनाक पासून):** 13/03/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 29/03/2026
**Time From (वेळेपासून):** 16:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 30/03/2026 **Time (वेळ):** 03:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 30/03/2026 03:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सापळा कारवाईवेळी पुना ,प्रिव्हेंटिव्ह कार्डीयालॉजी, सेंटर समोर व वाय के ,वडेवाले हॉटेल समोर सार्वजनिक

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री सतीश वाळके पोलीस उप अधीक्षक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1973

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रवि, पुणे, ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रवि, पुणे, ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8087002020

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. उदयसिंग भिमराव कुंभार वनक्षेत्र सव्हेक्षक उपवनसंरक्षक कार्यालय | | | 1. सेनापती बापट रोड, पुणे,,फ्रॅट नं 609, आय विंग, , विंडसर कोटी, दत्तनगर, कात्रज,, आंबेगाव पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विंलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 4,00,000/ रुपये | 400,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

400,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद तारीख - 30/03/2026

मी सतिश संभाजी वाळके, वय-53, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस उप-अधिक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे मो नं 8087002020.

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे दिंनाक 21/06/2025 रोजीपासून पोलीस उप-अधिक्षक या पदावर कार्यरत आहे. दि.13/03/2026 रोजी 11.00 वा मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री.दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तक्रारदार श्री. परशुराम मल्लाप्पा गंगानोर, वय 36, व्यवसाय जागा खरेदी विक्री रा.122 सावित्रीबाई फुले वसाहत, गणेश मळा, सिंहगड रोड, पुणे यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. श्री. दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तात्काळ आम्हाला सदर कारवाई करीता विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे या विभागाचे पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांना आम्ही आमचे कक्षात बसविले थोडयाच वेळात विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे विभागाचे श्री परमे·ार गलबू काळेल, वय 28 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- कनिष्ठ लिपीक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे व श्री अमित वासुदेव भोसले, वय 35 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- कनिष्ठ लिपीक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे हे लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे येथे 12.45 वाजता हजर झाल्यानंतर आम्ही नमुद पंच यांना आमची ओळख करुन देऊन तक्रारदार व पंचांची एकमेकांसोबत ओळख करुन दिली. पंचांची कारवाई संदर्भातील सहमती घेतली त्यानंतर नमुद कारवाई करीता पंच क्रं 1 म्हणुन श्री परमेश्वर गलबू काळेल हे व पंच क्र 2 श्री अमित वासुदेव भोसले हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार गंगानोर यांना आम्ही दोन्ही पंचासमक्ष त्यांची तक्रार कथन करण्यास सांगीतली त्यांनी ती कथन केली तिचे थोडक्यात वर्णन खालीलप्रमाणे.

"तक्रारदार यांना खाजगी वनामधील रिस्टोर्ड क्षेत्राच्या ऑर्डर आदेशाची जमिन खरेदी विक्री व्यवसाय करण्यासाठी आवश्यकता होती म्हणुन त्यांनी खाजगी वनामधील चिखलसे गाव ता. वडगाव मावळ, जि.पुणे येथील 1) सव्हे नंबर 79/2 अ,2 ब, 2) 85/2,4 3) 85/3 4) 85/4 5) 85/2 6) आपटी गाव, ता. वडगाव मावळ, जि.पुणे 202 7) 203 8) 165/5, 6, 175 9) कुणेनामा ता. वडगाव मावळ, जि.पुणे सव्हे नं. 127/2 10) 10/3, 4 11) 120/1 या जमिनीच्या रिस्टोर्ड क्षेत्राच्या ऑर्डर आदेशाच्या प्रमाणित प्रती मिळणेकामी उपविभागीय अधीकारी हवेली पुणे यांचे कार्यालयात फेब्रा ुवारी 2026 च्या पहिल्या आठवडयात चौकशी केली परंतु त्या ठिकाणी तक्रारदार यांना रिस्टोर्ड ऑर्डर मिळाल्या नाही. त्यांनी तक्रारदारांना पाहिजे असलेल्या रिस्टोर्ड ऑडर मिळण्यासाठी वन विभागाकडे अर्ज करण्यास सांगितले त्यामुळे त्याप्रमाणे तक्रारदार यांनी अर्ज तयार करून उपवनसंरक्षक कार्यालय सेनापती बापट रोड पुणे या कार्यालयात दिंनाक 13/02/2026 रोजी दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने दिंनाक 16/02/2026 रोजी उपवनसंरक्षक, कार्यालय सेनापती बापटरोड पुणे येथे जावून क्लार्क सतिश पाटील यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना तुमचे काम उदय कुंभार साहेबांकडे आहे त्यांना जावून भेटा असे सांगितले त्याप्रमाणे तक्रारदार हे उदय कुंभार, वनसर्वेक्षक यांना दिंनाक 26/02/2026 रोजी भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना दिंनाक 4/03/2026 रोजी कार्यालयात येवून भेटण्यास सांगितले होते त्याप्रमाणे तक्रारदार हे दिंनाक 4/03/2026 रोजी सायंकाळी 6.30 वाजण्याच्या सुमारास तक्रारदार



Scanned with OKEN Scanner

हे लोकसेवक श्री. उदय कुंभार यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना सांगितले की, "मी तुझे काम करतो पण त्यासाठी तुला खर्च करावा लागेल" त्यावेळेस लोकसेवक यांनी तक्रारदारांनी मागणी केलेल्या 11 रिस्टोर्ड ऑर्डर पैकी 7 ऑर्डर सापडल्या असल्याचे सांगून प्रत्येक ऑर्डरला दिड लाख रूपये या प्रमाणे तुला दयावे लागतील असे म्हणून तक्रारदार यांचेकडे लाच मागणी केली त्यानंतर तक्रारदार हे दिंनाक 6/03/2026 रोजी लोकसेवक श्री. कुंभार यंना भेटले असता लोकसेवक श्री. कुंभार यांनी तक्रारदार यांचेकडे प्रत्येक ऑर्डर साठी 1 लाख प्रमाणे एकुण रू. सात लाख रूपयांची मागणी केली व संध्याकाळी टोकन रक्कम दे असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी दिंनाक 7/03/2026 रोजी 12.33 वा टोकन म्हणून तक्रारदार यांचेकडून रू. 10 हजार रूपये घेतले आहेत. लोकसेवक श्री. कुंभार यांनी तक्रारदारांकडे मागणी केलेल्या लाच रक्कम 7 लाख रूपये ही देण्याची तक्रारदार यांना इच्छा नाही. त्यामुळे त्यांचेवर आपले विभागाकडून योग्य ती कारवाई करावी'' ही विंनती अशी लेखी तक्रार तक्रारदार यांनी दिंनाक 13/03/2026 रोजी 14.00 वाजता स्वहस्ताक्षरात लिहून दिली आहे. त्यावर पंच व आम्ही समक्ष म्हणून दिंनाकीत स्वाक्षरी केलेली आहे

त्यानंतर दिंनाक 13/02/2026 रोजी तक्रारदार परशुराम मल्लाप्पा गंगानोर यांनी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदार श्री. गंगानोर यांना उपवनसंरक्षक, कार्यालय सेनापती बापटरोड, पुणे, येथील कार्यालयात पाठवून लोकसेवक उदय कुंभार, वनसर्वेक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, सेनापती बापटरोड, पुणे हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत पडताळणी कारवाई करण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना शासकीय व्हाईस रेकॉर्डरबाबत माहिति देऊन पडताळणी कारवाई दरम्यान व्हॉईस रेकॉर्डरमध्ये संभाषण ध्वनीमुद्रीत केले जाणार असल्याची माहिती दिली. त्यानंतर शासकिय व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन कज्ग् कंपनीचे 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. एच.सी. आय. कार्ड मेमरी कार्ड त्याचेमागील बाजुस EETF32GMRO825 0032F5A55 K2523053063M असे लिहीलेले मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डर मध्ये बसविले. त्यानंतर सदरचे पडताळणी निवेदनाचे व्हिडीओ रेकॉर्डींग सोनी कंपनीच्या शासकीय व्हिडीओ कॅमे—यात केले जाणार असल्याची माहिती देऊन एक नवीन EVM कंपनीचे 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. एच.सी. आय. कार्ड मेमरी कार्ड त्याचे मागील बाजुस EETF32GMR0825 0032F5A55 W2517044242M असे लिहीलेले मेमरी कार्ड व्हिडीओ कॅमेरामध्ये बसविले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून प्रथम तक्रारदार श्री. परशुराम मल्लाप्पा गंगानोर यांचे त्यानंतर पंच नं. 1 श्री. परमेश्वर गलबू काळेल व पंच क्र. 2 श्री अमित वासुदेव भोसले यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन 14.26 ते 14.32 वा.चे दरम्यान ध्वनिमुद्रीत व व्हिडीओ रेकॉर्डीग केले निवेदन संपल्यानंतर रेकॉर्डर बंद केले.

तक्रारदार व पंच क्र. 1 यांना पडताळणी कारवाईच्या अनुशंगाने योग्य त्या सुचना देऊन शासकिय व्हाईस रेकॉर्डर हा पुन्हा चालु करुन तक्रारदार यांचे शर्टच्या आतील बाजुस लावला. त्यानंतर 14.52 वा. तक्रारदार श्री परशुराम मल्लाप्पा गंगानोर व पंच क्रमांक 1 श्री. परमेश्वर गलबू काळेल असे तक्रारदार यांचेकडील मोटार सायकल क्रमांक MH/12/RL/3075 या गाडीवरून लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता लो◌ेकसेवक यांच्या कार्यालयाकडे रवाना केले त्यावेळी आम्ही सापळा पथक व पंच क्रमांक 02 असे सर्वजन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, पुणे येथे थांबून राहीलो.

त्यानंतर 16.30 वाजण्याचे सुमारास तक्रारदार श्री. गंगानोर व पंच क्रमांक 1 श्री. काळेल हे पडताळणी पथक थांबलेल्या ला.प्र.वि. पुणे येथील कार्यालयात परत आले. तेव्हा तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करून तक्रारदार यांना घडलेल्या घटनेबाबत विचारले असता, त्यांनी सांगितले की, ते पंच क्र. 1 सह त्यांच्याकडील मोटार सायकलरून वनसर्वेक्षक, उपवनसंरक्षक, यांचे कार्यालय सेनापती बापटरोड, पुणे येथे लोकसेवक कुंभार साहेबांच्या केबीनकडे गेले त्यावेळी कुंभार साहेबांच्या केबीनमध्ये एक व्यक्ती बसली होती तेव्हा लोकसेवक श्री. कुंभार व तक्रारदार यांची पंच क्र. 1 यांचेसमक्ष त्यांचे कामासंदर्भात चर्चा झाली त्याचदरम्यान श्री. कुंभार यांनी त्यांच्या कार्यालयातील क्लार्क सतीश पाटील यांना बोलावून घेतले त्यांचे समोर देखील तक्रारदार याच्या रिस्टोर्ड ऑर्डर बाबत चर्चा झाली त्यावेळी सतीश पाटील यांनी तक्रारदार यांच्या अर्जातील 11 रिस्टोर्ड ऑर्डरपैकी 7 रिस्टोर्ड ऑर्डर सापडल्याचे सांगितले. त्यानंतर श्री. सतीश पाटील हे केबीनमधून निघुन गेले. त्यानंतर तक्रारदारांनी पंच क्र. 1 हे त्यांचे पार्टनर असल्याचे लोकसेवक श्री. कुंभार यांना सांगून त्यांचेसमक्ष पुढील चर्चा होणार असल्याचे सांगितले. त्यावर श्री. कुंभार हे तक्रारदारांना जे करायचय त्या प्रमाणे करा... असे म्हणाले त्यावर तक्रारदार श्री कुंभार यांना म्हणाले की, दोन मिनीट ऐकाकी, आता त्या दिवशी आपल्या गोष्टी झाल्या बरोबर..आता मला तोपर्यंत श्री कुंभार हे तक्रारदारांना आता मला काय बोलू नका तुम्हाला काय दयायचंय ते दया अन घेऊन जावा.. असे म्हणाले तेव्हा तक्रारदार श्री कुंभार यांना तुम्ही सांगा सर मला... असे म्हणाले. तेव्हा श्री. कुंभार साहेब तक्रारदारांना तुम्ही करा.. त्यात काय विषय नाय.. तुम्हाला काय करायचय हाच्यापशी ठेवा आणि घेऊन जावा तुमच तुम्ही.. असे



Scanned with OKEN Scanner

खुर्चीवरील व्यक्तीकडे उद्देशुन म्हणाले त्यानंतर तक्रारदारांनी श्री. कुंभार यांना म्हणाले की, मला सांगाना सर किती... आपल त्यादिवशी डन झाल होत सात लाखाच बरोबर...सात ऑर्डरच्या हिशोबानी. परत मी तुम्हाला म्हणल.. सर कमी करा म्हणल.. तुम्ही काय म्हणले.. कमी होणार नाही.. परत तुम्ही 10 पॉईंट चा आकडा सांगितला दहा पॉईंट लाख सर.. ठिकय ह्यांच्या समोर होऊ दया कस होतंय माहीतेय का..आमच्यामध्ये आम्ही तर पार्टनरय, म्हणजे आमच्यामध्ये मिस अडरस्टॅडींग नको... कारण की कसं.. करायला काय करल असे म्हणाले तेव्हा श्री. कुंभार हे तक्रारदारांना तुम्हाला जे योग्य वाटेल ते दया.. माझ्याकड झेरॉक्सचय... असे म्हणाले त्यावेळी तक्रारदारांचा आवाज मोठा असल्याने श्री.कुंभार तक्रारदारांना हळु बोलण्यास सांगितले व तक्रारदार आणि पंच क्र. 1 यांना उद्देशुन तुम्ही दोघ ठरवा असे म्हणाले.तेव्हा तक्रारदारांनी पंच क्र. 1 यांना त्यांचे पार्टनरच्या भुमीकेतून समजाविण्याकीता मी त्यांना ह्यांचा विषय कसा झाला सर्टीफाईड पाहिजे होत बरोबर... आता सर्टीफाईड पाहिजे होता दिड लाख असे म्हणालो तेव्हा ते मला मग असे म्हणाले त्यानंतर तक्रारदारांनी त्यांना एक लाख पर्यंत विषय झालाय मग आपण टोकण पण दिले 10,000/- रुपये.. त्यांच्याकडे टोटल ऑर्डर होत्या सात ऑर्डर, सातच आहेत म्हणजे आपल कन्फर्म झाल किती पाहिजे आपल्याला किती पाहिजे आकरा पैकी फक्त सात म्हणाले सर म्हणले एक ऑर्डर ला एक लाख रूपये अशा टोटल सात आहेत तेव्हा त्यांना अजुन म्हटल कमी करा .... ते म्हणले कमी होत नाहीत मार्केट रेट चालु आता असे श्री. कुंभार साहेबांचे समोर म्हणत असताना श्री. कुंभार यांनी तक्रारदारांना थांबविण्याकरीता स्टॉप स्टॉप स्टॉप आता विषय जे काय झाला ते पुढ असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार श्री. कुंभार यांना स्पष्ट पणे बोला उगाच काय होत तुम्ही तुम्ही सांगा उग काय होत माझ्या हिशोबाणी असे म्हणाले. तेव्हा श्री. कुंभार तक्रारदारांना तु बोल असे म्हणाले. त्यावर तक्रारदारांनी श्री. कुंभार यांना तुम्ही सांगा असे म्हणाल्यानंतर श्री. कुंभार तक्रारदारांना 50 टक्के करा.... असे म्हणाले. त्यावर स्पष्टता येण्याकरीता तक्रारदार यांनी श्री. कुंभार यांना आता 50 टक्के किती करावे सात का आठ म्हणाले तुम्ही असे विचारले तेव्हा श्री. कुंभार यांनी तक्रारदारांना नाय सातच असे म्हणाले व तक्रारदारांना उजव्या हाताची चार बोटे दाखवित एवढे करा टोटल असे म्हणाले तेव्हा तक्रारदारांनी चार लाख सर? असे प्रश्नार्थक विचारले तेव्हा श्री. कुंभार तक्रारदारांना तुझ काय करायच ते सांगितल होते ना.. डोक नको खाऊ असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदारांनी श्री कुंभार यांना एैका चार लाख पेक्षा कमी करा असे म्हणाले तेव्हा श्री. कुंभार तक्रारदारांना ते पण आजच करा असे म्हणाले. तक्रारदारांनी त्यांचेकडून दोन दिंवसाची मुदत घेत मी सोमवारी करतो असे म्हणाले. त्यावेळी श्री कुंभार सर यांनी त्यांच्या समोर बसलेल्या व्यक्तीकडे बोट दाखवून ह्यांचा नंबर आहे का तुमच्याकडे असे विचारले तेव्हा तक्रारदारांनी त्यांना नाही सर सांगा असे म्हणाल्यानंतर केबीनमधील त्रयस्थ व्यक्तीने तक्रारदारांना 9604103877 हा नंबर सांगितला त्याची खात्री तक्रारदारांनी केली. त्यानंतर शेवटी तक्रारदार श्री. कुंभार यांना सर एैका की चार लाख एवढ डन परत नका बोलवु असे म्हणाले तेव्हा श्री. कुंभार यांनी तक्रारदारांना हळु बोल रे बाबा... असे म्हणाले. त्यानंतर श्री. कुंभार यांनी तक्रारदारांना ते व्यक्ती सिग्नलला भेटतील असे सांगितले. नंतर तक्रारदार व पंच क्र. 1 हे त्यांच्याकडील गाडीने सिम्बॉयसीस कॉलेजच्या सिग्नलवर जाऊन थांबले व तेथे त्या व्यक्तीची वाट बघितली परंतु तो व्यक्ती आला नाही त्यानंतर तक्रारदारांनी त्यांच्या मोबाईलवरून मोबाईल नंबर 9604103877 यावर कॉल केला परंतु त्यांनी फोन रिसीव्ह केला नाही म्हणून तक्रारदारांनी श्री. कुंभार यांना फोन करून समोरील व्यक्ती कॉल रिसीव्ह करीत नसल्याचे सांगितले तेव्हा श्री. कुंभार यांनी करणार होते का आज असे पैसे देण्याबाबत तक्रारदारांना विचारले तेव्हा तक्रारदारांनी सोमवारी करणार आहे असे सांगितले तेव्हा श्री कुंभार यांनी त्यांना हो सोमवारी असे म्हणाले. त्यानंतर पंच क्र. 1 यांनीही तक्रारदार यांचेच मेळाची हकीगत सांगितली व संपुर्ण पडताळणी कारवाईदरम्यान तक्रारदार यांचेसोबत असल्याची माहिती सांगितली. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1, 2 व तक्रारदार यांचे समक्ष व्हाईस रेकॉर्डवरील संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता तक्रारदार यांचेकडे लोकसेवक श्री. कुंभार यांनी 7 रिस्टोर्ड ऑर्डरच्या प्रती देण्याकरीता रू. 7,00,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. 4,00,000/- मागणी केली असून ती सोमवार दि. 16/03/2026 रोजी लाच स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे तक्रारदार यांना लाच म्हणून दयावयाची रक्कम नमुद दिवशी आणण्याच्या व सकाळी 09.45 वाजता पंच, तक्रारदार व सापळा पथकास हजर राहण्याच्या सुचना दिल्या. नंतर दि. 13/03/2026 रोजीची कारवाई तात्पुरती स्थगित करणेचे ठरविण्यात आले दि. 13/03/2026 रोजी वापरलेले मेमरी कार्ड हे दि. 16/3/2026 रोजीचे सापळाकारवाईवेळी वापरण्याचे ठरविण्यात आले त्यामुळे दोन्ही मेमरी कार्ड जप्त करून राखून ठेवण्यात आले. सदर संपुर्ण कारवाईचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

दिंनाक 16/03/2026 रोजी सकाळी 09.30 वा. ला.प्र.वि, पुणे कार्यालयात आम्ही, तक्रारदार, दोन्ही पंच, सापळा पथक हजर झाले. लोकसेवक श्री. उदय कुंभार यांनी तक्रारदाराकडे केलेल्या लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. म.पो.कॉ. 1359 सुप्रिया मनकर यांना सापळापुर्व पंचनाम्याकरीता सापळा पथकात नव्याने समाविष्ठ करण्यात आले. तक्रारदार यांना लोकसेवकश्री. उदय कुंभार,



Scanned with OKEN Scanner

सर्वेक्षक यांनी लाचेची मागणी केलेली रक्कम रू. 4 लाख हजर करण्यास सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, त्यांना दयावयाच्या रू. 4,00,000/- लाचेच्या रकमेची व्यवस्था होवू शकली नाही, त्यांच्याकडे सध्या त्यांचे बचतीतील रू. 1 लाख रुपये असून उर्वरीत रक्कम जुळविणे त्यांना शक्य नाही असे सांगून भारतीय चलनातील रू. 500/- दराच्या 100 रुपयांचे 2 बंडल असे एकुण रू. 1,00,000/- हजर केल्या. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक पंच क्र. 2 यांचे मार्फतीने दोन पानावर लिहीण्यात आले त्यावर आम्ही, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी स्वाक्षरी केली आहे. लोकसेवकयांनी लाचेची मागणी केलेल्या चार लाख रुपये इतक्या लाच रकमेपैकी उर्वरीत रकमेची पुर्तता करणेकरीता पाचशे दराच्या नोटेसारख्या दिसणारे खेळण्यातील नोटांचा लाच रकमेत समावेश करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानुसार प्रत्येकी 100 नोटांचे 6 बंडल तयार करून घेतले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंच, आणि तक्रारदार श्री. गंगानोर यांना अल्ट्रा व्हॉयोलेट दिवा व अँथ्रासिन पावडर दाखवून कार्यवाहीतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सं◌ागितले. त्यानंतर कार्यालयात अंधार करून नोटांवर अ◌ॅन्थ्रासीन पावडर लागली नसल्याचे अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश टाकून खात्री करून दिली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन म.पो.कॉ. 1359 सुप्रिया मनकर यांनी रू 500/- दराच्या रोख रक्कमेच्या 200 नोट◌ांचे 2 बंडल व पाचशे दराच्या नोटेसारख्या हुबेहुब खेळण्यातील नोटांचे 6 रबर असलेले बंडल असे 4-4 बंडलचे दोन गट्ठे तयार करुन घेतले. हे नोटांचे बंडल एका मोठया कागदावर ठेवून त्यास सर्वबाजुने कापसाच्या बोळयाने अ◌ॅथ्रासिन पावडर लावली. अ◌ॅन्थ्रासीन पावडरबाबतचे प्रात्यक्षीक दोन्ही पंच व तक्रारदार यांना करून दाखविले. म.पो.कॉ. 1359 सुप्रिया मनकर यांनी प्रत्येकी 4 बंडलचे दोन बंडल असे रबर लावून एकत्रित बांधून ते एका फिक्कट पोपटी रंगाचे पाकीटात ठेवून त्यावर देखील अ◌ॅथ्रासिन पावडर लावली. नंतर सदरचे नोटांचे पाकीट तक्रारदार यांनी हजर केलेल्या एका निळया रंगाच्या कापडी बॅग मध्ये ठेवले नंतर तक्रारदार यांनी कापडी बॅगची चैन लावुन ती बॅग त्यांच्या ताब्यात घेतली. म.पो.कॉ. सुप्रिया मनकर यांना सापळा पथकातून वगळण्यात आले.

दिनाक 13/03/2026 रोजीचे पडताळणी कारवाई वेळी ताब्यात असलेले व्हाईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड सिंलबद पाकीटातून काढून ते व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले. तसेच ताब्यात असलेले व्हिडीओ चित्रीकरणासाठी वापरलेले मेमरी कार्ड सिलबद पाकीटातून काढून ते व्हिडीओ कॅमेरात बसविले. त्यानंतर सदर शासकिय व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार, पंच नं. 1 व पंच क्र. 2 यांचे सापळा कारवाईचे निवेदन 17.25 ते 17.30 वा.चे दरम्यान ध्वनिमुद्रीत करून त्याचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनांप्रमाणे तक्रारदार श्री. गंगानोर यांनी त्यांचा मोबाईल नंबर 9588446645 यावरून पडताळणी कारवाईवेळी लोकसेवक श्री. उदय कुंभार यांनी दिलेल्या व्यक्तीचा मोबाईल नंबर 9604103877 यावर 17.37 वा. कॉल लावला परंतु तो त्यांनी रिसीव्ह केला नाही. त्यानंतर तक्रारदार श्री. गंगानोर यांनी लोकसेवक श्री. उदय कुंभार यांना त्यांचा मोबाईल नंबर 9766044453 यावर कॉल करून लाचेची रक्कम नक्की कोणाकडे दयावयाची आहे याबाबत विचारणा करण्याचे सर्वानुमते ठरविले त्यानुसार तक्रारदार श्री. गंगानोर यांनी त्यांचा मोबाईल नंबर वरून लोकसेवक श्री. उदय कुंभार यांना त्यांचा मोबाईल नंबर 9766044453 यावर 17.51 वा. कॉल लावला परंतु त्यांनी सदरचा कॉल रिसीव्ह केला नाही.

त्यानंतर 18.12 वाजण्याचे सुमारास तक्रारदार यांचे मोबाईलवर मोबाईल नंबर 9604103877 यावरून मिसकॉल आला. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईलवरून मोबाईल नंबर 9604103877 वर 18.13 वा. कॉल केला तेव्हा समोरील व्यक्तीस तक्रारदार यांनी त्यांची ओळख सां◌ागून परवा भेटल्याची आठवण करून देत अरेंजमेंट झाले आहे असे सांगितले. त्यानंतर समोरील व्यक्तीने तक्रारदारांना हा ठीक आहे चालेल मग कधी येणार उद्या सकाळी येणार असेल तर या मग असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी कधी यायचे आहे याबाबत विचारणा करीत कुंभार साहेबांना फोन केल्याचे सांगितले तेव्हा समोरील व्यक्तीने तक्रारदारांना हा ते पण ट्रेनिंगला आहे ना. त्यांच असेल काय तर असे म्हणाले तसेच समोरील व्यक्तीने कॉर्नर जवळील सिग्नल येथे येण्यास सांगितले. परंतु सदर कॉलवेळी मोबाईल नंबर 9604103877 यावरील व्यक्तीने लोकसेवक श्री. उदय कुंभार हे ट्रेनिंककामी बाहेर असल्याची माहिती सांगितली असल्याने ऑर्डरच्या प्रती लोकसेवक श्री. उदय कुंभारकडून तक्रारदार यांना मिळाल्या नसत्या त्यामुळे तक्रारदारांना दिनाक 17/03/2026 रोजी लाचेची रक्कम देण्याकरीता पाठवून सापळा कारवाई आजमाविणे योग्य होईल असे सर्वानुमते ठरले. त्यानंतर तक्रारदार श्री. गंगानोर यांनी त्यांचा मोबाईल नंबर 9588446645 यावरून मोबाईल नंबर 9604103877 वर 18.36 वा. पुन्हा एकदा कॉल करून दुसरे दिवशी येणार असल्याचे सांगितले. त्यामुळे दि. 16/03/2026 रोजीची सापळा कारवाई स्थगित करून तक्रारदार यांनी हजर केलेली रक्कम ही आमचे ताब्यात घेवून कक्षात सुरक्षीत ठेवली. सदरची लाचेची रक्कम हि पुढील सापळा कारवाईत वापरण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसेच तक्रारदार यांनी नोंदविलेल्या लाचेच्या तक्रारीच्या अनुषंगाने मंगळवार, दिनाक 17/03/2026 रोजी सकाळी 10.00 वा. ला.प्र.वि.कार्यालयात येऊन पुन्हा एकदा सापळा

कारवाई आजमाविण्याचे दिनाक 17/03/20 कारवाईकामी उप यांना आम्ही त्यानुसार कार्याल दिना



Scanned with OKEN Scanner

कारवाई अजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. याबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. परंतु दिंनाक 17/03/2026 ते दिंनाक 23/03/2026 रोजीदरम्यान तक्रारदार यांचे नातेवाईक आजारी असल्याने ते कारवाईकामी उपस्थित राहू शकले नाहीत त्यामुळे दिंनाक 23/03/2026 रोजी 10.34 वा. तक्रारदार गंगानोर यांना आम्ही फोन वरून संपर्क केला असता त्यांनी दुपारी 14.00 वाजेपर्यन्त ऑफिसला येतो असे कळविले त्यानुसार आम्ही दोन्ही पंच व सापळा पथकास 14.00 वाजता कार्यालयात उपलब्ध ठेवले ठरल्याप्रमाणे तक्रारदार कार्यालयात आल्यानंतर पुढील सापळा कारवाई अजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

दिंनाक 23/03/2026 रोजी दि.13/03/2026 व दि. 16/03/2026 रोजीचे पडताळणी कारवाई वेळी जप्त करून जतन केलेले मेमरी कार्ड सिंलबद लिफाफ्यातून काढून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकले. व्हिडीओ चित्रीकरणाच्या फाईल्स जतन करण्याकरीता वापरलेले मेमरी कार्ड शासकिय व्हिडीओ कॅमेरामध्ये टाकले. दोन्ही पंच व तक्रारदार यांचे निवेदन 18.54 वा.व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत केले व त्याचे व्हिडीओ चित्रीकरण केले आहे. त्यानंतर तक्रारदार यांच्या मोबाईलवरून लोकसेवक कुंभार यांच्या मोबाईलवर कॉल करण्याचे व शासकिय व्हॉईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार तक्रारदार श्री. गंगानोर यांनी त्यांचे मोबाईलवरून 19.06 व 19.16 वाजता लोकसेवक श्री. उदय कुंभार यांचा मोबाईल नंबर 9766044453 यावर कॉल केले परंतु त्यांनी रिसीव्ह केले नाहीत. त्यानंतर लोकसेवक कुंभार यांचा 19.24 वाजता तक्रारदार गंगानोर यांच्या मोबाईल नंबर वर मिसकॉल आला. त्यानंतर तक्रारदार गंगानोर यांनी 19.25 वाजता लोकसेवक कुंभार यांना त्यांच्या मोबाईल नंबर 9766044453 वर कॉल केला तेव्हा तक्रारदार यांनी लोकसेवक कुंभार यांना कुणाला, फोन करु नका.... मी तुम्हाला देतो सगळं..... अण देतो सेटींग करुन.... आपण शनिवारी संध्याकाळी भेटू असे म्हणाले सदरचा कॉल रेकॉर्ड करण्यात आला आहे. त्यामुळे दि. 23/03/2026 रोजीची सापळा कारवाई स्थगित करून दिंनाक 28/03/2026 रोजी 12.00 वा. ला.प्र.वि.कार्यालयात येऊन पुन्हा एकदा सापळा कारवाई अजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याप्रमाणे हजर राहण्याच्या सर्वांना सुचना दिल्या व कारवाईदरम्यान वापरलेले दोन्ही मेमरीकार्ड पंचासमक्ष सिल केले. याबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिंनाक 28/03/2026 तक्रारदार गंगानोर, पंच व सापळा पथक हे लाप्रवि कार्यालय 12.00 वाजता उपस्थित झाल्याने पुढील सापळा कारवाई अजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. पडताळणी व सापळा कारवाई वेळी पुर्वी वापरलेले जतन केलेले मेमरी कार्ड सिंलबद लिफाफ्यातून काढून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकले. व्हिडीओ चित्रीकरणाच्या फाईल्स जतन करण्याकरीता वापरलेले मेमरी कार्ड शासकिय व्हिडीओ कॅमेरामध्ये टाकले. दोन्ही पंच व तक्रारदार यांचे निवेदन 15.54 वा.व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत केले व त्याचे व्हिडीओ चित्रीकरण केले आहे. त्यानंतर तक्रारदार यांच्या मोबाईलवरून लोकसेवक कुंभार यांच्या मोबाईलवर कॉल करण्याचे व शासकिय व्हॉईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार तक्रारदार श्री. गंगानोर यांनी त्यांचे मोबाईलवरून 16.10 वाजता लोकसेवक श्री. उदय कुंभार यांचा मोबाईल नंबर 9766044453 यावर कॉल केले परंतु त्यांनी कॉल रिसीव्ह केला नाही. त्यानंतर लोकसेवक कुंभार यांचा 16.59 वाजता तक्रारदार गंगानोर यांच्या मोबाईल नंबर वर कॉल आला. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवकांना शनिवारी संध्याकाळी भेटण्याबाबत विचारले तेव्हा लोकसेवक श्री. कुंभार यांनी आज पोहाचायला उशीर होईल उदया सकाळी नऊ दहा वाजता भेटू असे सांगितले सदरचा कॉल रेकॉर्ड करण्यात आला आहे. त्यामुळे दि. 28/03/2026 रोजीची सापळा कारवाई स्थगित करून दिंनाक 29/03/2026 रोजी 08.00 वा. ला.प्र.वि.कार्यालयात येऊन पुन्हा एकदा सापळा कारवाई अजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याप्रमाणे हजर राहण्याच्या सर्वांना सुचना दिल्या व कारवाईदरम्यान वापरलेले दोन्ही मेमरीकार्ड पंचासमक्ष सिल केले. याबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिंनाक 29/03/2026 तक्रारदार गंगानोर, पंच व सापळा पथक हे लाप्रवि कार्यालय 08.00 वाजता उपस्थित झाल्याने पुढील सापळा कारवाई अजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. पडताळणी व सापळा कारवाई वेळी पुर्वी वापरलेले जतन केलेले मेमरी कार्ड सिंलबद लिफाफ्यातून काढून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकले. व्हिडीओ चित्रीकरणाच्या फाईल्स जतन करण्याकरीता वापरलेले मेमरी कार्ड शासकिय व्हिडीओ कॅमेरामध्ये टाकले. सापळा कारवाईमध्ये म.पो.हवा.गोरे व पो.हवा.काकडे यांचा नव्याने समावेश करण्यात आला. तक्रारदार, दोन्ही पंच यांचे सापळा कारवाईचे अनुशंगाने 09.20 वाजता निवेदन घेतले ते ध्वनीमुद्रीत केले असून त्याचे व्हिडीओ चित्रीकरण केले आहे. म.पो.हवा.गोरे यांचेकडून पुर्वी जतन करून सुरक्षीत ठेवलेली लाचेची रक्कम बाहेर काढून त्यातील नोटांचे नंबरबाबत पंचांसमक्ष खात्री केली. त्यानंतर पुन्हा एकदा नोटांचे बंडल व फिक्कट पोपटी रंगाचा लिफाफ्यास सर्वबाजुने कापसाच्या बोळ्याने अॅन्थ्रासिन पावडर लावली. अॅन्थ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम तक्रारदार यांच्याकडील निळ्या रंगाच्या कापडी पिशवीत टाकून ती तक्रारदार यांच्या दुचाकीच्या डिक्कीमध्ये ठेवून म.पो.हवा.वनिता गोरे यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले. तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक यांना सापळा कारवाईचे अनुशंगाने



Scanned with OKEN Scanner

सुचना दिल्या.
त्यानंतर तक्रारदार श्री. गंगानोर यांनी त्यांचा मोबाईलवरून लोकसेवक श्री. उदय कुंभार यांचा मोबाईलवर कॉल करून त्यांना कधी व कोठे भेटावे याबाबत विचारणा करण्याचे ठरविण्यात आल्याने लोकसेवक श्री. उदय कुंभार यांचे नंबरवर 10.32 व 10.39 वाजता कॉल केले परंतु सदरचे कॉल कनेक्ट झाले नाहीत त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार यांचे मोबाईल नंबरचे व्हॉटस्अॅपवर लोकसेवक श्री. उदय कुंभार यांचा मोबाईल नंबर 9766044453 वरून व्हॉटस्अॅपवर मिसकॉल आला तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे व्हॉटस्अॅपवरून लोकसेवक श्री. उदय कुंभार यांचे व्हॉटस्अॅप नंबरवर 10.52 वाजता कॉल केला त्यावेळी लोकसेवक श्री. कुंभार यांनी पुना प्रिव्हेन्टीव्ह हॉस्पीटल, अरण्येश्वर चौक येथे असून तिथे येताका संपवुन टाकु विषय आज काय आहे, मी बारा वाजेपर्यंत तेथे आहे असे तक्रारदार यांना सांगितले. त्यानुसार शासकीय वाहन एरटीगा क्र. एम.एच. 12 यु.सी. 4109 हीमध्ये सापळा कारवाईकरीता लागणारे सर्व आवश्यक साहित्य घेऊन 11.19 वाजता रवाना झालो तसेच तक्रारदार श्री. गंगानोर व पंच क्र. 1 श्री. काळेल यांना तक्रारदार यांचेकडील खाजगी मोटार सायकल टीव्हीएस जुपिटर क्रमांक MH/12/RL/3075 वरून शिंवदशन रोड येथील फुडी फिंरगी कॅफे समोर, अरण्येश्वर येथे आमचेबरोबर येण्यास सांगितले. त्यानुसार आम्ही व तक्रारदार हे सदर ठिकाणी 11.44 वा. पोहोचलो. त्यानंतर 11.44 वा. तक्रारदार यांना शासकीय वाहनामध्ये घेऊन सापळा कारवाईचे अनुशंगाने दिलेल्या सुचनांची सर्वांना उजळणी करून दिली. तक्रारदार यांचे शर्टच्या आतील बाजुस व्हाईस रेकॉर्डर चालू करून लावून तक्रारदार व पंच यांना 11.59 वा. तक्रारदार व पंच त्यांचेकडील गाडीने रवाना झाले व त्यांचेपाठोपाठ आम्ही शासकीय वाहनाने रवाना झालो तक्रारदार व पंच हे पुना प्रिव्हेन्टीव्ह कार्डीओलॉजी या हॉस्पीटलचे समोर असणारे पार्कींगजवळ वाहन लावून थांबले त्याचवेळी आम्ही सापळा लावून आजूबाजूला थांबून राहीलो. काही वेळाने तक्रारदार व पंच  यांचेजवळ एक गुलाबी रंगाचा शर्ट घातलेला इसम लोकसेवक श्री. कुंभार हे तेथे आले व तक्रारदारांशी शासकीय प्रलंबित कामासंदर्भात बोलणी करून ठेवा गडीच्या डिकीत तुम्हाला देतो सगळ एक तासाभरात पोच करतो घरी असे बोलून लाच रक्कम लोकसेवक यांच्या गाडीचे डिक्कीत ठेवण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक तेथे जवळच असणारे वायके वडेवाले या हॉटेलजवळ लोकसेवकांचे गाडीवर बसून गेले. तेथे तक्रारदार यांनी पंचांना बोलावून घेतले त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. कुंभार यांना पंचांसमक्ष देऊ का सर असे विचारले असता लोकसेवक यांनी दे असे म्हणाले त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांच्या गाडीतील निळ्या रंगाची बॅग काढून त्यातील लाचेची रक्कम उजव्या हातात घेऊन लोकसेवक यांच्या सुझुकी अॅक्सेस गाडी नं. एम.एच.50 पी. 9995 हीचेजवळ गेले तेथे त्यांनी उघडा की असे म्हणून गाडीची डिक्की उघडण्यास सांगितले तेव्हा लोकसेवक यांनी नाय उघडीच आहे असे म्हणाले त्यानंतर तक्रारदारांनी उघडंय?, डिक्कीत ठेऊन टाकूना? असे प्रश्नार्थक विचारले तेव्हा लोकसेवक श्री. कुंभार यांनी तक्रारदार यांना हा हा असे म्हणाले म्हणून तक्रारदार यांनी त्यांचेकडील लाच रक्कम ही पंचांसमक्ष लोकसेवक श्री. कुंभार यांचे सुझुकी अॅक्सेस गाडीचे डिक्कीमध्ये ठेवली. अशाप्रकारे लोकसेवक श्री. कुंभार यांनी लाचेची रक्कम स्विकारली. सदरची रक्कम डिक्कीमध्ये ठेवल्यानंतर तक्रारदार यांनी डाव्या हाताने डोक्यावरून फिरवून सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर व्हिडीओ चित्रीकरण सुरू करून सापळा पथकाने तात्काळ लोकसेवक श्री. कुंभार यांना ताब्यात घेतले. तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केले ती वेळ 12.35 वा. ची होती. ताब्यात घेतेवेळी लोकसेवक श्री. कुंभार यांनी सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांचेशी झटापट करून पळून जाण्याचा प्रयत्न केला व तोंड सुखले असल्याचे व बी.पी.वाढला असल्याचे सांगितले. लोकसेवक यांना ताब्यात घेतल्यानंतर पंच क्र. 1 यांना लाच रक्कम कोठे आहे असे विचारले असता त्यांनी सदरची लाच रक्कम ही लोकसेवक यांचे दुचाकीचे डिक्कीमध्ये असल्याचे सांगितले. सदरची लाच रक्कम पंच क्र. 2 श्री. भोसले यांना ताब्यात घेण्यास सांगितली लाचेची रक्कम, तक्रारदार यांच्या हाताची, तक्रारदार यांच्याकडील बॅगेची व लोकसेवक यांचे दुचाकी वाहनाची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे सहाय्याने कृत्रीम अंधार करून पाहणी केली असता डिक्कीमध्ये अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली तशीच चकाकी लाचेच्या रक्कमेवर, तक्रारदार यांचेकडील बॅगेवर तसेच तक्रारदार यांच्या हातावर दिसून आली. व सापळापुर्व पंचनाम्यादरम्यान लिहून घेतलेल्या नोटांचे नंबर व ताब्यात घेतलेल्या लाच रक्कमेचे नंबरची पडताळणी केली असता ते तंतोतंत जुळून आले. लोकसेवक यांचे ताब्यात तक्रारदार यांना संपर्क करण्यासाठी वापरलेला अॅप्पल कंपनीचा मोबाईल फोन, दुचाकी वाहन व दुचाकी वाहनाची चावी मिळाली असून ते ताब्यात घेऊन जप्त केले आहे. त्यानंतर ताब्यात घेतलेले लोकसेवक कुंभार यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी श्री. उदयसिंग भिमराव कुंभार, वय 46 वर्षे वनक्षेत्र सव्हेक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, सेनापती बापट रोड, पुणे, रा. फ्लॅट नं. 609, आय विंग, विंडसर कोटी, दत्तनगर, कात्रज, पुणे असे असल्याचे सांगितले. त्यानंतर लोकसेवक श्री. कुंभार यांना त्यांचे शासकीय कार्यालय असणारे उपवनसंरक्षक कार्यालय, सेनापती बापट रोड येथे घेऊन गेलो व त्यांचे कार्यालयाची पाहणी केली असता तक्रारदार श्री. परशुराम गंगानोर यांचा 11 रिस्टोर्ड ऑर्डर



Scanned with OKEN Scanner

मिळणेकरीता दि. 13/02/2026 रोजीचा अर्ज तसेच श्री. परशुराम गंगानोर यांना दिंनाक 13/03/2026 रोजी रिस्टोर ऑर्डर देत असलेबाबत तयार केलेले मुळ पत्र मिळून आले त्याची सत्यप्रत प्राप्त करून ताब्यात घेण्यात आलेली आहे. तक्रारदार यांचे गाडीचे डिक्कीमध्ये मिळालेली लाच रक्कम, पडताळणी व सापळा कारवाईवेळी वापरलेले मेमरी कार्ड जप्त करण्यात आले आहे. तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी यातील तक्रारदार श्री. परशुराम गंगानोर यांनी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे येथे दि. 13/03/2026 रोजी दिलेल्या लाच मागणीचे तक्रारीचे अनुशंगाने पंचासमक्ष दि.13/03/2026 रोजी 14.52 ते 16.30 दरम्यान पडताळणी कारवाई केली असता वन सव्रहेक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, सेनापती बापट रोड, पुणे येथील नेमणुकीस असणारे लोकसेवक श्री उदयसिंग भिमराव कुंभार यांनी त्यांचे कक्षात तक्रारदाराने मागणी केलेल्या 11 रिस्टोर्ड ऑर्डर पैकी 7 क्षेत्राच्या रिस्टोर्ड ऑर्डर त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे सांगून त्या तक्रारदाराला देण्यासाठी तडजोडअंती तक्रारदाराकडे 4,00,000/- रुपयांची लाचेची मागणी करून आज दि. 29/03/2026 रोजी 12.35 वाजण्याचे सुमारास पुना प्रिव्हेंटिव्ह कार्डीयालॉजी सेंटर समोर व वाय के वडेवाले हॉटेल समोर सार्वजनिक रोडवर आरणेश्वर चौक, पुणे या ठिकाणी करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान लोकसेवक उदयसिंग भिमराव वय 46 वनश्रेत्र सव्रहेक्षक, उप वन संरक्षक कार्यालय, सेनापती बापट रोड पुणे यांनी स्वतः तक्रारदाराकडून रू. 1,00,000/- भारतीय चलनातील नोटा व रू. 3,00,000/- खेळण्यातील नोटा अशी एकुण रू. 4,00,000/- लाच स्वीकारली असता यशस्वी सापळा कारवाई करण्यात आलेली आहे म्हणून माझी त्यांचेविरोधात भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फिंयाद आहे.

दाखल अधिकारी -श्री सतीश वाळके, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि, पुणे, मोबाईल नंबर 8087002020
तपास अधिकारी -प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक ला.प्र.वि पुणे मोबाईल नंबर 9923444998

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
SAGAR BABURAO PATIL
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): PBMAH88107
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Vitthal Shankar Paw

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**



Scanned with OKEN Scanner